
सकाळ मुंबई, बुधवार, ४ डिसेंबर २०२४

# मेट्रोचे विहंगम दृश्य...



सत्यवान वास्कर : सकाळ छायाचित्र सेवा

**नवी मुंबई :** सिडकोने सुरू केलेल्या नवी मुंबई मेट्रोला नोव्हेंबर महिन्यात एक वर्ष पूर्ण झाले आहे. शिक्षण, नोकरीनिमित्त नवी मुंबई, ठाण्यात जाणाऱ्या प्रवाशांची या मेट्रोला मोठी पसंती मिळत आहे. खारघर ते बेलापूरदरम्यान धावत असणारी ही मेट्रो खारघर शहरामधून जातानाचे दृश्य सुंदर दिसते.

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

सकाळ | मुंबई, बुधवार, ४ डिसेंबर २०२४

# सिडकोची अग्निशमन केंद्रे पनवेल पालिकेकडे सुपूर्द

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते हस्तांतरण; ११० नवीन कर्मचाऱ्यांची नियुक्ती

कामोठे, ता. ३ (बातमीदार) : पनवेल महापालिका एमएमआर भागात सर्वांत चांगल्या सेवा-सुविधा देते याचा अभिमान आहे. मोठी उद्दिष्टे ठेवून आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली महापालिकेची सर्व टिम पनवेलकरांना अपेक्षित असलेले सहकार्य देऊन, आपत्कालीन सेवेसाठी दक्ष राहण्याचे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

नवीन पनवेल आणि कळंबोली अग्निशमन केंद्राचे सिडकोकडून पनवेल महापालिकेस हस्तांतरण करण्यात आले. याप्रसंगी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते. या वेळी आयुक्त मंगेश चितळे, माजी महापौर कविता चौतमोल, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक संतोष शेट्टी, मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त कैलास गावडे यांनी केले. तसेच समारोप सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे यांनी केले. पालिकेच्या अग्निशमन विभागात नुकत्याच झालेल्या भरती प्रक्रियेत ११० अग्निशमन कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आलेली आहे.



पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते सिडकोच्या कळंबोली व नवीन पनवेल येथील अग्निशमन केंद्रांचे पालिकेकडे हस्तांतरण करण्यात आले.

### पालिकेची आता तीन हक्कांची केंद्रे :

कळंबोली आणि नवीन पनवेल अग्निशमन केंद्रांच्या हस्तांतरणाने पालिकेकडे हक्काची पनवेल, कळंबोली, नवीन पनवेल असे तीन अग्निशमन केंद्रे झाली आहेत, अशी माहिती आयुक्त मंगेश चितळे यांनी दिली. नवीन पनवेल व कळंबोली येथील अग्निशमन केंद्रांतील प्रत्येकी दोन अग्निशमन वाहनांसमवेत हस्तांतरण करण्यात आले आहे.

@Cidco Ltd | @cidco_Ltd | @cidco_Ltd | @CIDCO Ltd. | cidco.maharashtra.gov.in

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

महाराष्ट्र टाइम्स | मुंबई | बुधवार, ४ डिसेंबर २०२४

# अग्निसुरक्षा पालिकेच्या हाती

## सिडकोकडील दोन अग्निशमन केंद्रांचे पनवेल महापालिकेकडे हस्तांतरण

म. टा. वृत्तसेवा, पनवेल

तळोजा एमआयडीसीसह पनवेल महापालिका क्षेत्रातील महत्त्वाच्या भागांत सेवा देणाऱ्या सिडकोच्या दोन महत्त्वपूर्ण अग्निशमन केंद्रांचे हस्तांतरण सिडकोने महापालिकेकडे केले आहे. पनवेल महापालिकेला यासाठी सुमारे सात कोटी रुपये मोजावे लागले आहेत. सोमवारपासून महापालिकेच्या अग्निशमन जवानांनी सेवा देण्यास सुरुवात केली.

३५ वर्षांपासून सिडकोकडून देण्यात येणाऱ्या नवीन पनवेल आणि कळंबोलीतील अग्निशमन सेवेला अखेर पूर्णविराम देण्यात आला. पनवेल महापालिकेच्या अग्निशमन विभागात ११५ कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली आहे. परंतु पनवेल शहरात एका अग्निशमन केंद्राशिवाय अन्य कोणतेही केंद्र नसल्यामुळे नव्या कर्मचाऱ्यांना कोणतेही काम नव्हते. अखेर सोमवारपासून नव्या कर्मचाऱ्यांना हक्काचे अग्निशमन केंद्र मिळाले आहे.

सिडकोकडून चालविण्यात येणाऱ्या नवीन पनवेल आणि कळंबोलीच्या अग्निशमन केंद्राच्या हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण झाल्यामुळे महापालिकेने याचा ताबा घेतला. ३५ वर्षे जुन्या असलेल्या केंद्रांच्या इमारतीचा मोबदला सिडकोने घेतलेला नाही. परंतु भूखंडाचे पैसे घेण्यास सिडको मंडळ विसरलेले नाही. दोन्ही केंद्रांच्या भूखंडांसाठी एकूण सात कोटी रुपये सिडकोला द्यावे लागले आहेत. दोन्ही केंद्रांमध्ये प्रत्येकी ३६ खोल्यांच्या दोन वसाहतींचाही समावेश आहे. त्यामुळे ७२ कुटुंबांच्या निवासाचीही व्यवस्था होणार आहे. जुन्या वसाहतींची देखभाल, दुरुस्ती करण्यात येणार आहे. याशिवाय, सिडकोने दोन फायरइंजिन आणि दोन वॉटर टँकर अशी चार अग्निशमन वाहनेही मोफत दिली आहेत. पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत सोमवारी हस्तांतरणानंतरचा कार्यक्रम झाला. माजी महापौरही कार्यक्रमाला हजर होत्या. सिडकोच्या कर्मचाऱ्यांचे खारघर, द्रोणागिरी आणि उलवे येथील सिडकोच्या अखत्यारितील केंद्रांत समावेशन करण्यात आले आहे.

### कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

अग्निशमन दलाच्या नुकत्याच भरती झालेल्या कर्मचाऱ्यांना वेगवेगळ्या आपत्तींत बचावकार्य करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात आले. २० जणांना कोलाड येथे जलआपत्ती प्रशिक्षण देण्यात आले. पालिकेत सध्या आस्थापनेवरील ९४ आणि कंत्राटी ४२ अशा एकूण १३६ कर्मचाऱ्यांना टप्प्याटप्प्याने हे प्रशिक्षण दिले जाईल.

### कर्मचाऱ्यांची नियुक्ती

मुख्य अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडखे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन्ही केंद्रांत कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक केंद्रात दोन उपअग्निशमन अधिकारी, दोन लिडिंग फायरमन, १४ यंत्रचालक व उर्वरित फायरमन नेमून दोन्ही केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. नवीन पनवेलमध्ये ४४ आणि कळंबोलीत ४२ कर्मचारी कार्यान्वित करण्यात आले आहेत.

- पनवेल, कळंबोलीतील अग्निशमन केंद्रे हस्तांतरित
- भूखंडांच्या किमतीपोटी सात कोटी रुपये मोजले
- ७२ कुटुंबांच्या निवासाचीही व्यवस्था होणार



चित्र : प्रतिकात्मक

> “नवीन पनवेल आणि कळंबोलीतील अग्निशमन केंद्रे अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. तळोजा एमआयडीसीतील कारखान्यांना लागलेल्या आगीवर पूर्वी सिडकोच्या कळंबोली केंद्रातून नियंत्रण आणले जात होते. आता कामोठे, रोडपाली, तळोजा भागांत महापालिकेची सक्षम केंद्रे सेवा देण्याचे काम करेल.
>
> – मंगेश चितळे, आयुक्त, पनवेल महापालिका

CIDCO
WE MAKE CITIES

NEWS

महाराष्ट्र टाइम्स | मुंबई | बुधवार, ४ डिसेंबर २०२४

# बेकायदा बांधकामांवर हातोडा

म. टा. वृत्तसेवा, नवी मुंबई



सिडकोच्या अतिक्रमणविरोधी पथकाने सोमवारी कोपरखैरणे आणि घणसोली नोडमधील दोन अनधिकृत आरसीसी इमारतीच्या बांधकामांवर कारवाई करून दोन्ही जमीनदोस्त केले.

कोपरखैरणे सेक्टर ४ ए येथील मोकळ्या भूखंडावर आत्माराम ऐडगे यांनी तीनमजली बेकायदा बांधकाम सुरू केले होते. तर, घणसोली, तळवली सेक्टर २० येथील भूखंडावर लक्ष्मण लोहार यांनी बांधकाम सुरू केले होते. या दोन्ही बांधकामांप्रकरणी सिडकोने नोटीस बजावली होती. मात्र त्याची दखल न घेतल्याने ही बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली.

@Cidco Ltd @cidco_Ltd @cidco_Ltd @CIDCO Ltd. cidco.maharashtra.gov.in

नवे शहर बुधवार, ४ डिसेंबर २०२४

# कोपरखैरणे, घणसोली येथील अनधिकृत बांधकामांवर 'सिडको'ची कारवाई


नवी मुंबई : 'सिडको'च्या अतिक्रमण विरोधी पथकाने कोपरखैरणे आणि घणसोली नोडमधील २ अनधिकृत आरसीसी इमारतीच्या बांधकामावर कारवाई करुन दोन्ही अनधिकृत इमारतींचे बांधकाम जमीनदोस्त केले. सदर बांधकाम 'सिडको'च्या प्रचलित नियमावली आणि धोरणांचा भंग करुन कोणत्याही प्रकारची अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आल्याने त्याविरोधात कारवाई करण्यात आल्याचे 'सिडको'चे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांनी सांगितले.




'सिडको'च्या जागेवर उभारण्यात येत असलेल्या अनधिकृत बांधकामावर अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाकडून धडक कारवाई सुरुच असून २ डिसेंबर रोजी देखील 'सिडको'च्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण पथकाने कोपरखैरणे, सेक्टर-४ ए येथील सर्व्हे नं. २०६, २१२ आणि २०१ या मोकळ्या भूखंडावर सुरु असलेल्या आरसीसीच्या तीन मजली अनधिकृत बांधकामावर कारवाई केली. आत्मराम ऐडगे यांनी सदर ठिकाणी अनधिकृतपणे इमारतीचे बांधकाम सुरु केले होते. त्यामुळे या अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात आली.

त्याचप्रमाणे 'सिडको'च्या पथकाने घणसोली, तळवली सेक्टर-२० येथील सर्व्हे नं. १९९ अणि १२० या मोकळ्या भूखंडावर लक्ष्मण लोहार यांनी सुरु केलेल्या अनधिकृत आरसीसी फ्लेन्थच्या बांधकामावर कारवाई करुन सदरचे बांधकामही जमीनदोस्त केले. या दोन्ही इमारतीच्या अनधिकृत बांधकामास 'सिडको'च्या अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाने नोटीस बजावली होती. त्यानुसार संबधितांनी सदरचे अनधिकृत बांधकाम थांबवणे गरजेचे होते. मात्र, त्यानंतर देखील सदर इमारतीचे बांधकाम सुरुच ठेवण्यात आल्याने 'सिडको'च्या पथकाने या दोन्ही अनधिकृत इमारती जमीनदोस्त केल्या.

सदरची मोहीम मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार तसेच मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाचे अधिकारी आणि पोलीस कर्मचारी, सिडको पोलीस पथक, 'सिडको'चे सुरक्षा रक्षक यांच्या सहभागाने यशस्वीपणे राबविण्यात आली.




मुंबई, बुधवार, ४ डिसेंबर २०२४

मुंबई तरुण भारत
www.mahamtb.com

# सिडकोच्या भूखंडांवर डेब्रिज टाकणाऱ्यांवर कारवाई

**नवी मुंबई, दि. ३ : प्रतिनिधी**

'सिडको महामंडळा'ने संपादित केलेल्या तसेच संपादित करण्यात येत असलेल्या जमिनीवर आणि भूखंडावर मोठ्या प्रमाणात अनधिकृतपणे डंपर वाहन चालकांकडून डेब्रिज टाकण्यात येत आहे. हे डेब्रिज मानवी आरोग्यास धोकादायक व पर्यावरणास हानीकारक असल्याचे सिडकोच्या निदर्शनास आले आहे. अनधिकृत डेब्रिजला आळा घालण्याच्या दृष्टीने मुख्य दक्षता अधिकारी, सिडको यांच्या नेतृत्वाखाली सिडकोकडून कारवाईला सुरुवात करण्यात आली आहे.

**'सिडको महामंडळा'कडून जमिनींचे संरक्षण**

सिडको कार्यक्षेत्रात मोहीम राबवत असताना अधिकाऱ्यांना डम्पर चालक फुलचंद राममिलन साहनी हा व्यक्ती एमटीएचएल अटल सेतू, मुंबई ते उलवे रोड, सेक्टर-१२, उलवे नवी मुंबई येथे मोकळ्या जागेत डेब्रिज टाकत असताना मिळून आला. यांच्याविरुद्ध न्हावाशेवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

नवभारत टाइम्स । मुंबई। बुधवार, 4 दिसंबर 2024

# नवी मुंबई में मलबा डंप करने वालों पर कार्रवाई

AI Image



■ **निसं, नवी मुंबई:** मुंबई और उपनगरों में चल रहे निर्माण कामों के दौरान निकलने वाले डेब्रिज (मलबे) को नवी मुंबई में अवैध रूप से डंप करने का मामला सामने आया है। इस मामले में सिडको ने तीन डंपर जब्त किए हैं, जो नवी मुंबई के गवन इलाके में मलबा खाली कर रहे थे। उलवे पुलिस स्टेशन में डंपर चालकों के खिलाफ मामला दर्ज किया गया है।

बता दें कि मुंबई और आस-पास के उपनगरों में चलने वाले विकास कार्यों के दौरान बड़ी मात्रा में डेब्रिज निकल रहा है। इसे ठिकाने लगाने के लिए कुछ ट्रांसपोर्टर्स डेब्रिज की ढुलाई का ठेका लेते हैं और डेब्रिज नवी मुंबई लाया जाता है। सिडको क्षेत्र के खुले भूखंडों, सार्वजनिक स्थलों और मैंग्रोव्स क्षेत्रों में मलबा डंप कर दिया जाता है। सिडको की विजिलेंस टीम ने पनवेल तालुका के गवन इलाके में डेब्रिज डंप करते हुए तीन डंपरों को पकड़ा है। इन डंपर के ड्राइवर इरशाद जियाउद्दीन शेख (59), अकील शकील अहमद (43) और शकील अहमद मोहम्मद सुल्तान अंसारी (48) के खिलाफ उलवे पुलिस स्टेशन में मामला दर्ज कराया गया है। सिडको के मुख्य सतर्कता अधिकारी सुरेश मेंगडे ने बताया कि सिडको की अधिग्रहित भूमि पर बिना अनुमति डेब्रिज डंप करने वालों के खिलाफ सख्त कार्रवाई जारी रहेगी। सिडको पिछले एक साल से इस तरह की अवैध गतिविधियों के खिलाफ अभियान चला रहा है। अब तक कई डंपर जब्त किए गए हैं। विशेष अभियान का उद्देश्य नवी मुंबई को डेब्रिज माफिया से बचाना और पर्यावरण को संरक्षित रखना है।

> तीन डंपर जब्त, ड्राइवर के खिलाफ मामला दर्ज

साप्ताहिक
नवी वार्ता
दिनांक - मंगळवार । ३ डिसेंबर ते ९ डिसेंबर, २०२४

# 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' योजनेतील अटी दूर
## महागृहनिर्माण प्रकल्पाला मुदत वाढ




**नवी मुंबई :** सिडकोची बहुप्रतिक्षित योजना 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' ही योजना सुरु केली आहे. या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणीला ११ नोव्हेंबरपर्यंतची मुदत देण्यात आली होती. आता सिडकोने या योजनेतून अधिकाधिक नागरिकांचे घराचे स्वप्नपुर्ण व्हावे या करीता ऑनलाइन अर्ज नोंदणीला ११ डिसेंबर २०२४ पर्यंतची मुदतवाढ दिली आहे. त्याच बरोबर या योजनेतील काही अटी शिथिल केल्या आहेत. पसंतीचे घर योजनेतून आपल्या घराचे स्वप्न साकार करावे, असे आव्हान सिडकोने केले आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ११ ऑक्टोबर रोजी वाशी येथील सिडको प्रदर्शन केंद्रात आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटासाठी 'माझे पसंतीचे सिडकोचे घर' ही गृह योजनेचा शुभारंभ केला होता. १२ ऑक्टोबर पासून घरांसाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरु करण्यात आली असून महिनाभरात १२ हजारांहून अधिक अर्ज प्राप्त झाले आहेत. सिडकोच्या अन्य गृहनिर्माण योजनांप्रमाणेच या गृहनिर्माण योजनेला भरभरुन प्रतिसाद मिळाला आहे.

### सिडकोने 'या' अटी केल्या शिथिल

अर्ज नोंदणीला मुदतवाढ दिल्याने उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवास प्रमाणपत्र आदी आवश्यक कागदपत्रांची जमवाजमव करण्यास अधिकचा अवधी मिळाला आहे. तसेच ऑनलाईन नोंदणी करताना बारकोड असलेले प्रमाणपत्र सादर करण्याची अटही शिथिल करण्यात आली आहे. ऑनलाइन नोंदणी करताना बारकोड नसलेले रहिवास प्रमाणपत्र सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे, परंतु वाटपपत्र देण्यापूर्वी बारकोड असलेले रहिवास प्रमाणपत्र सादर करणे अर्जदारांना अनिवार्य असणार आहे. शंभर आणि पाचशेच्या स्टॅम्प पेपरवर शपथपत्र, वचनपत्र सादर करण्याची अटही शिथिल केली आहे. त्यामुळे अर्जदारांना कोऱ्या कागदावर स्वसाक्षांकित शपथपत्र, वचनपत्र सादर करता येणार आहे.

### ६७००० घरांची महायोजना

विविध नोडसमध्ये ६७ हजार घरांची महायोजना साकारली जात आहे. या गृहनिर्माण योजनेतील पहिल्या टप्प्यातील वाशी, बामणडोंगरी, खारकोपर, खारघर, तळोजा, मानसरोवर, खांदेश्वर, पनवेल आणि कळंबोली नोडमध्ये प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक व अल्प उत्पन्न गटाकरिता २६,००० सदनिका उपलब्ध करून दिल्या आहे.